MHNS140000952026

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.०२/२०२६ मधील नि.क्र. १४ वरील आदेश</u>**

**योगिता शिंदे व इतर वि ताराबाई शिंदे**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने दुरुस्ती करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८च्या आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार यांनी सदर प्रकरण वारस दाखल मिळणेसाठी केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांच्याकडून अनावधानाने अर्ज कलम ८ मधील चौथ्या ओळीमध्ये "महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीत" असे टंकलेखन करताना चूक झाली आहे. त्यामुळे ते कमी करुन त्याऐवजी "मराठा विदया प्रसारक समाज नाशिक या शैक्षणिक संस्थे अंतर्गत राजश्री शाहू महाराज पॉलिटेक्निक नाशिक, ता.जि. नाशिक या संस्थेत" अशी दुरुस्ती करण्यात परवानगी मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे. अश्या परिस्थितीत मुळ अर्जात दुरुस्ती करणे क्रमप्राप्त झाले आहे. सबब, अर्जदाराने प्रस्तुत अर्जात् परिच्छेद २ मध्ये नमुद दुरुस्तीची परवानगी मागितली आहे.

३. अर्जाचे अवलोकन केले तसेच अभिलेखाचे देखील अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज हा वारसदाखला मिळणेकामी दाखल केला आहे. सबब, अर्जदारांच्या कथनांचा व अभिलेखावरील वस्तुस्थितीचा विचार करता त्या अनुषंगाने अर्जात दुरूस्ती करणे

आवश्यक झाले आहे.

४. सबब, प्रस्तुत अर्जातील दुरुस्ती करणे न्यायोचीत ठरेल. तसेच सदर दुरुस्तीने मुळ अर्जाच्या स्वरुपात व मागण्यांमध्ये कोणताही बदल झाल्याचे दिसत नाही. याउलट अर्ज गुणवत्तेवर निर्णय देण्यासाठी सदर दुरुस्ती आवश्यक असल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो. करीता खालील आदेश पारित करीत आहे :

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदाराने अर्जाप्रमाणे दुरुस्ती करुन तशी दुरुस्तीची प्रत १४ दिवसामध्ये दाखल करावी.

PANDIT ASHWINI ANIL
Digitally signed by PANDIT ASHWINI ANIL
Date: 2026.03.24 16:01:08 +0530

दि. २४/०३/२०२६ (अ. अ. पंडित)
दिंडोरी. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
दिंडोरी (MH03260)